महेश काकडे
बी.ई (सिव्हिल), एम.ई. (स्ट्रक्च.),
एफ.आय.ई (इंडिया), एम.आय.एस.टी.ई.
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
Mahesh Kakade
B. E. (Civil), M. E. (Struc.)
FIE (INDIA), MISTE
Director,
Board of Examinations & Evaluation

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४, महाराष्ट्र
SHIVAJI UNIVERSITY,
KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA

दूरध्वनी (थेट) : २६९३१७६,
२६०९०६७, २६०९०६८
Phone : (Dir.) 2693176,
2609067, 2609068
Website : www.unishivaji.ac.in
E-mail : coe@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ/संपवमूमं/1214 दि. 25 MAR 2019

प्रति,

मा. प्राचार्य/ संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था

मा. अधिविभागप्रमुख
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- दि. २६.०३.२०१९ रोजी आयोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रशिक्षणाबाबत..

महोदय,

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेचा प्रारंभ दि. २६.०३.२०१९ रोजी सुरु होत आहे. सदर परीक्षेचे नियोजन विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ८८ प्रमाणे निश्चित केले असून त्यानुसार नियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षेस प्रारंभ होत आहे. दरम्यान लोकसभेच्या सार्वजनिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहिर झाला असून विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्हयामध्ये दि. २३.०४.२०१९ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने तिन्ही जिल्हयामधील महाविद्यालयांचे अधिकारी, कर्मचारी व अध्यापक यांना निवडणुक कार्याचे कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. दि. २६.०३.२०१९ रोजी कोल्हापूर तसेच सांगली जिल्हयामध्ये प्रशिक्षण होणार असून त्याच दरम्यान परीक्षा सुरु होत आहेत. या अनुषंगाने निम्नस्वाक्षरीकार यांनी मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांची भेट घेऊन दि. २६.०३.२०१९ रोजीचे प्रशिक्षण इतर वेळी आयोजित करण्याचे विनंती केली. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदरचे प्रशिक्षण दि. ३१.०३.२०१९ रोजी जिल्हयामध्ये विविध ठिकाणी आयोजित करण्याचे आश्वासित केले आहे. याअनुषंगाने सर्व प्राचार्यांना अवगत करण्यात येते की, आपल्या माहाविद्यालयातील परिक्षा दि. २६.०३.२०१९ रोजी सुरळितपणे सुरु करावी व निवडणुक प्रशिक्षण करिता संबधितांनी दि. ३१.०३.२०१९ रोजी तपशिलाप्रमाणे प्रशिक्षणास प्रतिनियुक्त करावे. नियमानुसार सर्व संबंधितांचा दि. ३१.०३.२०१९ हा कर्तव्य कालावधी समजण्यात येईल.

आपला विश्वासू,

महेश काकडे,
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

माहितीस्तव मानार्थ अग्रेषित:-

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
३. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

प्रत माहितीसाठी:-

१. मा. कुलगुरु कार्यालय
२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय
३. कुलसचिव कार्यालय

दि. ३१.०३.२०१९ रोजी झालेल्या चर्चेमध्ये खालीलप्रमाणे निवडणुक प्रशिक्षण कार्यक्रमाचे केंद्र निश्चित केले करण्यात आलेले आहे. संबंधित केंद्राचे संलग्नित महाविद्यालयांचा तपशिल, याव्यतिरिक्त त्याच महाविद्यालयाचा उल्लेख नाही तथापि निवडणुक जबाबदारी आदेशित असतील त्यांनी त्यांच्या सोयीप्रमाणे जवळच्या प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणी प्रशिक्षणासाठी उपस्थित राहावे.

# प्रशिक्षण केंद्राबाबतचा तपशिल

## १. कोल्हापूर शहरातील प्रशिक्षण केंद्र

कोल्हापूर शहर व परिसरातील सर्व महाविद्यालये , तसेच पेठवडगांव, रुकडी, कळे, कागल, तिसंगी, कोपार्डे येथील महाविद्यालये

## २. पन्हाळा येथील प्रशिक्षण केंद्र

मलकापूर, सरुड, कापशी , वारणा

## ३. इचलकरंजी येथील प्रशिक्षण केंद्र

जयसिंगपूर, कुरुंदवाड, हातकणंगले, हुपरी

## ४.गडहिंग्लज येथील प्रशिक्षण केंद्र

आजरा, चंदगड, हलकर्णी, कोवाड, नेसरी, महागांव

## ५.गारगोटी येथील प्रशिक्षण केंद्र

मुरगूड, सोळंकूर, बिद्री, करुकली भोगावती, निपाणी, उत्तूर